Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# इंदिरा गांधी यांचे १९८० ते १९८४ दरम्यान शेजारील राष्ट्रांशी संबंधाचा अभ्यास

**राऊलवाड गंगाधर गंगाधर**
संशोधक,
राज्यशास्त्र संशोधन केंद्र पीपल्स कॉलेज, नांदेड
raulwadgangadhar@gmail.com

**प्रस्तावना**

प्रस्तुत संशोधनामध्ये इंदिरा गांधीच्या १९८० ते १९८४ या कालावधीत भारताच्या शेजारील राष्ट्रांच्या संबंधाचा अभ्यास करण्यात आला आहे. इंदिरा गांधी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर ३० जानेवारी १९८० रोजी लोकसभेत म्हणाल्या होत्या की, कोणत्याही देशासोबत भारताचे संबंध हे दुसऱ्या देशांच्या संबंधावर आधारित राहणार नाहीत. १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून बोलताना त्यांनी शेजारील राष्ट्रांना सुचित केले की, राष्ट्रा-राष्ट्रात मतभेद होतात. परंतु समान विचार असतील तर दुसऱ्यांची मदत किंवा सहकार्य करणे आवश्यक होते. हे करता आले तर बराच खर्च वाचेल. परंतु जर कोणी धमकी देत असेल तर त्याचा सामना करण्यास भारत समर्थ आहे." ८ ऑक्टोबर १९८१ रोजी मनिला येथे फिलीपाईन्सचे राष्ट्रपती फडर्डीनेंड मार्कोस यांनी आयोजित केलेल्या मेजवानीत इंदिरा गांधी म्हणाल्या की, एखादे राष्ट्र त्याच्या शेजारी राष्ट्रांना पसंत करेल किंवा नाही परंतु भौगोलिक परिस्थिती कोणतेही राष्ट्र बदलू शकत नाही. अशा परिस्थितीत हेच योग्य होते की शांतता, सद्भावना, मित्रता आणि सहकार्य इत्यादीचा अवलंब करावा.

१ ऑक्टोबर १९८१ रोजी मेलबोर्न येथे राष्ट्रकुल कार्यकारी मंडळाच्या बैठकीत इंदिरा गांधी म्हणाल्या की, आग्नेय आशियातील युद्धरत राष्ट्रांनी सर्वांसोबत समान हिताला प्राधान्य देऊन चर्चेच्या माध्यमातून प्रश्नांची सोडवणूक करावी. पुढे १ ऑगस्ट १९८३ रोजी दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्यासाठी परराष्ट्र मंत्र्यांची बैठक दिल्ली येथे आयोजीत करण्यात आली. या बैठकिला संबोधित करताना इंदिरा गांधी म्हणाल्या की, आजचे आव्हान म्हणजे आर्थिक मागासलेपणावर मात करण्याचे आहे. नॅम चळवळीमध्ये सहभागी होत असताना प्रत्येक देशाच्या शासनप्रणालीचा आदर करायला पाहिजे. त्याचवेळी कुठल्याही प्रकारचे मतभेद चर्चेच्या आधारावर खेळीमेळीच्या वातावरणात सोडवले पाहिजेत. संपूर्ण जगाचे अस्तित्व आणि विकास हा मानवजातीच्या एकात्मता आणि राजकीय वैविध्यातील सहनशिलता यावर आधारलेला आहे. या चौकटीत राहून दक्षिण आशियी राष्ट्रांचे संबंध जोपासून प्रश्न आणि समस्या कमी करून चांगल्या शांततापूर्ण स्थिरतेला सहाय्य करून अधिक बळकटी दिली पाहिजे. एकमेकांतील सहकार्य हे प्रत्येकाचे स्वातंत्र्य व न्याय यावर आधारित आहे. भारताची अशी अपेक्षा आहे की एकत्रपणे काम करून कृषी, ग्रामीण विकास, दूरसंचार, हवामान, आरोग्य, तंत्रज्ञान, संस्कृती, कला आणि क्रीडा यांची देवाण-घेवाण करणे. याचअनुषंगाने इंदिरा गांधी यांची १९८० ते १९८४ दरम्यान शेजारील राष्ट्रांशी राहिलेल्या संबंधाचा अभ्यास खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक इत्यादी संशोधन पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**संशोधनाची गृहीतके**

१. पाकिस्तान आणि बांग्लादेश राष्ट्रांशी इंदिरा गांधीच्या संबंधाचा अभ्यास करणे.
२. चीन, नेपाळ आणि श्रीलंका राष्ट्रांशी इंदिरा गांधीच्या संबंधाचा अभ्यास करणे.

**पाकिस्तान बरोबर संबंध**

लोकसभेला संबोधित करताना ३० जानेवारी १९८० रोजी इंदिरा गांधी म्हणाल्या की, भारताने पाकिस्तानच्या नेत्यांशी नव्याने बोलणी करून मैत्रीपूर्ण संबंध बनवू इच्छितो आणि सिमला करारानुसार प्रत्येक क्षेत्रात सहयोग करू इच्छितो. त्यानुसार इंदिरा गांधींनी स्वरणसिंग यांना आपले राजदूत म्हणून पाकिस्तानला पाठविले. झिया-उल-हक व परराष्ट्रमंत्री आगाशाही यांनी स्वरणसिंग यांच्याकडे अशी मागणी केली की भारताने आपल्या सैन्याचा आकार कमी करावा. स्वरणसिंग यांनी त्यांना असे सांगितले की दोन देशांमध्ये विश्वासवर्धक उपाययोजना कराव्यात. आगाशाही यांनी जुलै १९८० मध्ये भारताला भेट दिली. त्यावेळी भारताने काबुल येथील सरकारशी संबंध तोडावे व सोव्हिएट शस्त्रे घेणे बंद करावे अशा मागण्या केल्या.

२१ ऑक्टोबर १९८० रोजी दिल्ली येथे पत्रकार परिषद झाली. इंदिरा गांधी म्हणाल्या की, झिया यांनी सिमला कराराच्या शब्दांचा आणि भावनेचा अनादर करीत काश्मीरचा प्रश्न उपस्थित केला. काश्मीर आंतरराष्ट्रीय मुद्दा बनविण्याचा प्रयत्न झाला. त्यांना असे सांगण्यात आले होते की पाकिस्तान तीन वर्षात अणुचाचणी घेणार होता. जर तसे झाले तर भारताकडून अण्वस्त्र शक्तीच्या शांततापूर्ण धोरणात बदल होणे शक्य होणार नाही. ९ एप्रिल १९८१ रोजी संरक्षण मंत्रालयाच्या खर्चाच्या मागणी संदर्भात लोकसभेत चर्चा झाली. त्यावेळी इंदिरा गांधी म्हणाल्या की, पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री आगाशाही दोन वेळा भारतात आले होते. त्यांच्या आमंत्रणावरून आणि सिमला करारानुसार भारताचे परराष्ट्र मंत्री लवकरच इस्लामाबादला जातील. भारताला हे लक्षात घ्यावे लागत होते की गेल्या दहा वर्षात पाकिस्तानने संरक्षण क्षमता दुप्पट केली होती. पाकिस्तानची सुरक्षा व्यवस्था अॅटलांटिक महासागर ते हिंदी महासागरापासून प्रशांत महासागरापर्यंतच्या एका बृहत क्षेत्रातील सैनिकी घडामोडीचे अंग बनली होती याची भारताला चिंता होती. जर पाकिस्तानने अणुबॉम्ब बनविला तर त्याचे गंभीर परिणाम भारतीय उपखंडात होतील.

१० जून १९८१ रोजी भारताचे परराष्ट्रमंत्री पी.व्ही. नरसिंहराव आणि पाकचे परराष्ट्रमंत्री आगाशाही यांच्या इस्मालाबादमध्ये झालेल्या दोन दिवसीय चर्चेत सिमला करारासंदर्भात असे निश्चित केले गेले की शांतता आणि द्विराष्ट्रीय संबंधाचे संवर्धन करण्यासाठी हा करार वचनबद्ध होता. त्याचबरोबर दोन्ही सार्वभौम देशांना स्वसंरक्षणासाठी शस्त्रास्त्र बाळगण्याचा अधिकार होता. दोन्ही पक्षाकडून असे निग्रहाने सांगितले गेले की नॅमच्या तत्वांचे पालन करून लष्करी करारापासून ते दूर राहतील. १० जुलै १९८१ रोजी इंदिरा गांधी म्हणाल्या की परराष्ट्रमंत्री नुकतेच पाकिस्तानला जावून आले आणि चिनी परराष्ट्रमंत्री काही दिवसांपूर्वी येऊन गेले. यामुळे भारताचे शेजारील राष्ट्रांसोबत पहिल्यांदाच खडतर आणि अडचणीच्या सुरूवातीत चांगले संबंध प्रस्थापित होत होते. पत्रकार परिषदेमध्ये इंदिरा गांधी यांनी ब्रिटन आणि ऑस्ट्रेलिया यांनी पाकिस्तानला परत राष्ट्रकुलमध्ये स्थान दिल्याबद्दल आक्षेप घेतला. त्या म्हणाल्या की पाकिस्तान त्यांच्या स्वतःच्या इच्छेने राष्ट्रकुलमधून बाहेर पडला होता.

१७ सप्टेंबर १९८१ रोजी लोकसभेत अविश्वास प्रस्तावावरील चर्चेदरम्यान इंदिरा गांधी म्हणाल्या की, अमेरिकेने पाकिस्तानला एफ-१६ विमाने देण्याचा निर्णय घेतला तर त्यातून तणाव उत्पन्न होईल. भारताच्या शेजाऱ्याने अशा सुरक्षा सामग्री प्राप्त करणे भारताच्या सामग्रीच्या एक पाऊल पुढे होते. भारतावर हा आरोप होता की भारत शस्त्रास्त्राचे साठे बनवित होता. भारत सिमला करारानुसार काम करीत होता. पाकिस्ताननेही तेच धोरण स्वीकारायला पाहिजे होते. परंतु त्याच्या कार्यातून असे होत नव्हते. ४ ऑक्टोबर १९८२ रोजी काश्मिर संदर्भात यूनोच्या वार्षिक आमसभेमध्ये पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री साहिबजदा याकूब खान म्हणाले की, भौगोलिक आणि राजकीय प्रभाव बाजूला ठेऊन चांगले संबंध प्रस्थापित करण्यासाठी शांततापूर्ण सहजीवनाच्या अपेक्षा आणि एका

चांगल्या पिढीच्या भवितव्यासाठी विचार केला पाहिजे. पाकिस्तानची अशी प्रामाणिक इच्छा होती की दोन्ही देशांतील अत्यंत महत्वाची समस्या म्हणजे जम्मू-काश्मीर वादावर चा तोडगा याचा चर्चेत अंतर्भाव असावा.

१ नोव्हेंबर १९८२ रोजी दिल्ली येथे इंदिरा गांधी आणि झिया-उल-हक यांची भेट झाली. दोन्ही नेते मार्च १९८३ च्या दिल्ली येथील नॅम परिषदेतील भेटीसाठी सहमत झाले होते. संयुक्त निवेदनानुसार दोन्ही सरकारांनी इन्डो-पाक संयुक्त आयोग स्थापनेसाठी सहमती दर्शविली. मंत्र्यांच्या पातळीवरील संयुक्त आयोग प्रस्तावात दोन्ही देशांतील व्यापार, प्रवास, आर्थिक, वैज्ञानिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक इत्यादी सहकार्याचा विषय असणार होता. इंदिरा गांधी म्हणाल्या की, जेव्हा आगाशाही दिल्लीत येतील त्यावेळी या मुद्यांवर बोलणी करण्यात येईल. द्विपक्षीय चर्चेत प्रादेशिक आणि जागतिक मुद्यांवर चर्चा केली जाईल. इंदिरा आणि झिया बोलणी झाली तेव्हा दोन्ही देशांतील परदेशी कैद्यांची सुटका करण्यासाठी सहमती दर्शविली. त्यानुसार १० मार्च १९८३ रोजी भारत आणि पाकिस्तानमध्ये संयुक्त आयोगाच्या व्यवस्थेसाठी समझोता झाला. दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी इंदिरा गांधी आणि झिया-उल-हक यांच्या उपस्थितीत करारावर सह्या केल्या. पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री याकूब खान म्हणाले संयुक्त आयोग द्विपक्षीय संबंध वाढविण्यासाठी एक संस्थात्मक चौकट निर्माण करेल. यावेळी नरसिंहराव म्हणाले दोन्ही देशांच्या निकट संबंधाच्या प्रक्रियेतील मुख्य आणि महत्वाच्या वृद्धीसाठी मदत होईल.

१७ जानेवारी १९८४ रोजी नवीन व्यापार समझोते करण्यात आले. त्यानुसार कृषी, रेल्वे, आरोग्य, उद्योग, विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि दूरसंचार इत्यादी बाबतीत सहकार्याला प्राधान्य दिले. हा समझोता इस्लामाबादेतील ३ दिवसीय भारत-पाक संयुक्त आयोगाच्या व्यापार आणि आर्थिक घटकावरील दुसऱ्या बैठकीनंतर घोषित करण्यात आला. १५ ऑगस्ट १९८४ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त लाल किल्ल्यावरून भाषण करताना इंदिरा गांधी म्हणाल्या की, भारत व पाकिस्तान यांच्या संबंधात चांगले वातावरण निर्माण होण्यासाठी भारत पाकिस्तान यांच्यात मैत्री, सहकार्य व शांततेच्या माध्यमातून दोन्ही देशांचा विकासास गती मिळणार आहे. एकंदरीत इंदिरा गांधीने १९८० ते १९८४ दरम्यान पाकिस्तान बरोबर संबंध सुधारण्याला प्राधान्ये दिल्याचे दिसून येते.

**बांग्लादेश बरोबर संबंध**

भारत आणि बांग्लादेशाच्या ३ हजार चौरस मैल सीमेवर कोणत्याही प्रकारचे कुंपन नव्हते. त्यामुळे सीमापार करून निर्वासित येणे हे अडचणीचे कारण बनले होते. ऑक्टोबर १९८० मध्ये सीमा प्रश्नावरून दोन्ही देशात करार झाला. बांग्लादेशाने न्यूमूर बेटावरून वाद निर्माण केला होता. न्यूमूरची समस्या मे १९८१ मध्ये अधिक विस्फोटक बनली जेव्हा बांग्लादेश सरकारने भारतीय जहाज आय.एन.एस. च्या उपस्थितीला आक्षेप घेतला. पुढे ६ ऑक्टोबर १९८२ रोजी बांग्लादेशचे अध्यक्ष एच. एम. इरशाद हे भारत दौऱ्यावर आले. इंदिरा गांधी म्हणाल्या की बांग्लादेश व भारत यांच्यात आर्थिक व तांत्रिक सहकार्याला खूप वाव होता व दोन्ही देशांनी संयुक्त आर्थिक आयोग स्थापन करण्यास संमती दिली होती ही चांगली बाब होती.

झिया-उर-रहमान यांनी दक्षिण आशियायी क्षेत्रीय सहकार्य संघटनांचा प्रस्ताव ठेवला. यात भारत, बांग्लादेश, पाकिस्तान, नेपाळ, भूतान, मालदीव तसेच श्रीलंकेला सामील केले गेले. या प्रस्तावाचे भारताने सुरूवातीला स्वागत केले नव्हते. बऱ्याच विचारविनिमयानंतर इंदिरा गांधींनी सार्क संघटनेसाठी चर्चेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. मार्च १९८३ मध्ये ढाका येथे परराष्ट्र सचिवांची चौथी बैठक झाली. या बैठकीत बांग्लादेश, भूतान, भारत, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका इत्यादी देश होते. पुढील बैठक १-२ ऑगस्ट रोजी झाली. पी.व्ही. नरसिंहराव हे या बैठकीत मुख्य म्हणून निवडून आले. परराष्ट्र मंत्र्यांनी या बैठकीत दक्षिण आशियायी प्रादेशिक सहकार्यासाठी प्रस्तावातील उद्देश आणि तत्वे यांचा उल्लेख केला. एकंदरीत इंदिरा गांधीने १९८० ते १९८४ दरम्यान पाकिस्तान बरोबर संबंध सुधारण्याला प्राधान्ये दिल्याचे दिसून येते.

**चीन बरोबर संबंध**

चीनचे परराष्ट्रमंत्री ह्वांग व्हा यांनी जून १९८० मध्ये दिल्लीला भेट दिली. या भेटीत दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची चर्चा झाली. चिनी नेत्यांनी सीमा करारावर चर्चा करण्याचा प्रस्ताव भारतासमोर ठेवला. चीनचे उपपंतप्रधान तंग सियाओ पिंग यांनी एका मुलाखतीमध्ये भारतासोबत मैत्रीपूर्ण संबंधासाठी इच्छा व्यक्त केली होती. त्यांच्या मते दोन्ही बाजूस वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय समस्यांवरून कोणतेही गंभीर मतभेद नव्हते. काश्मीर हा भारत-पाक दोघांमधला मुद्दा होता. भारताने या विधानाचे स्वागत केले होते. तसेच चर्चेच्या आधारावरील मैत्रीपूर्ण संबंधाच्या प्रस्तावाला संमती दर्शविली.

२९ डिसेंबर १९८० रोजी टाईम्स ऑफ इंडियाच्या प्रतिनिधी फातिमा झकारिया यांनी मुलाखतीत असे म्हटले होते की, भारत-चीन संबंध शत्रुत्व नाही व मैत्री नाही अशा अवस्थेत होते. याविषयी इंदिरा गांधी म्हणाल्या की, चीन पाश्चात्यांच्या आर्थिक मदतीवर विसंबून होता. ही परिस्थिती अशीच राहिली तर चीनचा दृष्टिकोन असाच राहणार होता. सोव्हिएट युनियनच्या बाबतीत चीनच्या मनात शत्रुत्वाची भावना होती. भारताला गरजेच्यावेळी ज्यांनी मदत केली त्याच्याकडे भारत दुर्लक्ष करू शकत नव्हता.२६ जून १९८१ रोजी दिल्ली येथे चीनचे परराष्ट्रमंत्री ह्वांग व्हा आणि नरसिंहराव यांच्यात तीन दिवस चर्चा झाली. सीमेसंदर्भातील मुद्यांवर बोलणी करण्यासाठी भारत-चीन सहमत झाले. भारतीय अधिकारी पातळीवरील उच्चस्तरीय संघ पेइचिंगला भेट देईल असे ह्वांग व्हा यांनी पत्रकार परिषदेत घोषित केले.

तंग म्हणाले की चीन-भारत सीमा वादाचे समाधान चर्चेच्या माध्यमातून एक दुसऱ्याच्या सन्मानाच्या आधारावर केले जावू शकेल. याच दिवशी भारत व चीन यांच्यात वार्तालाप करण्यासाठी शिनव्हा आणि प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियामध्ये एका करारावर सह्या झाल्या, की त्यांचे सरकार निर्णय घेऊन भारतीय धार्मिक स्थळे, कैलास पर्वत आणि तिबेटमधील मानससरोवर याला भेट देणे शक्य करील. चिनी पंतप्रधान इंदिरा गांधींना चीनला भेट देण्यासाठी निमंत्रण देतील. चिनी नेत्यांनी हे स्वीकारले की भारत-चीन संबंधाला मैत्रीपूर्ण बनविण्यासाठी सीमा समस्या सोडविणे प्रथम आवश्यक होते." तीन दिवसाच्या चर्चेच्या शेवटी ते या निष्कर्षावर पोहोचले होते की द्विपक्षीय संबंधाच्या सामान्यीकरणासाठी सीमा वादावर लवकर चर्चा करून सांस्कृतिक, वैज्ञानिक, तांत्रिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये परस्पर सहकार्य आणि देवाण-घेवाण करण्याला प्राधान्य देण्याची गरज व्यक्त केली. यानुसार १९८२ मध्ये सीमा प्रश्नावर तीन वेळेस चर्चा झाली. परराष्ट्र मंत्रालयाच्या अहवालात सांगितले गेले की मूळ प्रश्नाला धरून इतर सर्व द्विपक्षीय विषयावर चर्चा झाली. सीमा समस्येच्या व्यतिरिक्त दोन्ही देशात येणाऱ्या दोन वर्षामध्ये व्यापारिक संबंधाच्या विकासासाठी समीक्षा केली. तसेच त्यावर समाधान व्यक्त केले. चीनने भारत-पाक संयुक्त आयोगाच्या स्थापनेबाबतीत आपली प्रसन्नता जाहीर केली.

चर्चेच्या २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी १९८३ रोजी पेईचिंग येथे झालेल्या तिसऱ्या फेरीत चीन-भारत सीमा प्रश्नावर बोलणी झाली. भारतीय प्रतिनिधी मंडळात परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव के. एस. वाजपेयी आणि चीनमधील भारतीय राजदूत होते. तर चीनच्या प्रतिनिधी मंडळातील फू व्हा हे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे सल्लागार होते. दोन्ही प्रतिनिधी मंडळात द्विपक्षीय व्यापाराचा विकास आणि आर्थिक क्षेत्रातील नवीन सहकार्यावर चर्चा करण्यात आली. २४ ऑक्टोबर १९८३ रोजी प्रारंभ झालेल्या चर्चेदरम्यान चीनने सीमा प्रश्नावर होणाऱ्या चर्चेसाठी अनुकूल भूमिका घेतली. तसेच ३० ऑक्टोबर रोजी चिनी उपपरराष्ट्रमंत्री तसेच भारताच्या परराष्ट्र सचिवांनी एका करारावर स्वाक्षरी करताना सीमावाद क्षेत्रानुसार सोडविण्यासाठी आपली सहमती दर्शविली. दोन्ही पक्षात या मुद्यांवर सहमती झाली की सीमा समस्येला सोडविण्यासाठी ऐतिहासिक पुरावा आणि तेथील परंपरेला सुद्धा लक्षात घेण्यात येईल. तसेच क्षेत्रीय अधिग्रहणासाठी लष्कराचा प्रयोग केला जाणार नाही. एकंदरीत इंदिरा गांधीने १९८० ते १९८४ दरम्यान पाकिस्तान बरोबर संबंध सुधारण्याला प्राधान्ये दिल्याचे दिसून येते.

**नेपाळ बरोबर संबंध**

प्रथम पासूनच नेपाळ आणि भारत संबंध सामान्य स्थितीत मैत्री आणि सहकार्यपूर्ण राहिले. इंदिरा गांधी पुन्हा सत्तेत आल्यानंतर नीलम संजीव रेड्डी आणि नरसिंहराव यांनी नेपाळ यात्रा केली. यात भारताकडून नेपाळच्या विकासात्मक परियोजनेला सहाय्यता देण्याचे आश्वासन दिले. १९८१ मध्ये उर्जा मंत्री गनी खॉ चौधरी यांनी नेपाळला भेट देऊन देवीघाट पणन वीज योजनेला सहाय्य देवून विकासाभिमुख योगदान देण्याचे आश्वासन दिले. नेपाळचे राजे विरेंद्र डिसेंबर १९८१ रोजी दिल्लीत आले. दोन्ही देशांत चर्चा होऊन संयुक्त निवेदनात म्हटले की भारत आणि नेपाळचे मित्रतापूर्ण संबंध राहतील आणि दोन्ही देश एकमेकांना सहाय्यता करतील. या भेटीदरम्यान नेपाळला शांतता क्षेत्र घोषित करण्याचा मुद्दा उपस्थित केला गेला. भारताचे असे उत्तर होते की एकटे नेपाळच का? संपूर्ण आशियाला शांतता क्षेत्र घोषित केले पाहिजे.

एप्रिल १९८२ मध्ये भारताच्या एका उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळाने नेपाळच्या विकास कामाचे परिक्षण केले आणि भारताकडून नेपाळच्या विकास कार्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करण्याची घोषणा केली. मे मध्ये भारत व नेपाळ यांनी एक संयुक्त उद्योग आयोग नेमला. या आयोगाच्या शिफारशीनुसार १९८२ मध्ये दोन्ही देशांत समझोता झाला. त्यानुसार नेपाळला व्यापारिक आणि देशांबाहेरील प्रवास सुविधा दिल्या. कलकत्ता बंदरातून नेपाळी वस्तूंच्या निर्यातीला चालना दिली. नेपाळी वस्तूंना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणांपर्यंत वेगाने पोहोचविण्याच्या सुविधा दिल्या. भारत नेपाळी व्यापाऱ्यांकडून तिप्पट कर वसूल करत असे ते धोरण बंद केले. बंदरातून वस्तू घेण्याचा कालावधी ४५ दिवसांचा केला. एकंदरीत इंदिरा गांधीने नेपाळच्या प्रगतीसाठी आर्थिक मदत देण्याबरोबर व्यापारातसुद्धा मदत केल्याचे दिसून येते.

**श्रीलंका बरोबर संबंध**

२१ ऑक्टोबर १९८० रोजी दिल्ली येथे पत्रकार परिषदेत इंदिरा गांधी म्हणाल्या की, राजकीय अधिकार किंवा मताधिकारापासून तमिळ अल्पसंख्यकांना वंचित ठेवण्याने त्यांना फार दुःख झाले होते. फेलिक्स भंडारनायके यांनाही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मताधिकारापासून वंचित ठेवले हे चुकीचे होते. ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीपासून सिंहली बहुसंख्यक वर्ग आणि तमिळ अल्पसंख्यक वर्गामध्ये तणाव वाढला. १ जुलै १९८३ मध्ये तमिळ विरोधी दंगली भडकल्या. यामुळे जवळपास तीन लाख निर्वासित भारतात आले होते. यांचे गांभीर्ये लक्षात घेता इंदिरा गांधींनी श्रीलंकेवर दबाव टाकला की त्यांनी या मुद्यावर पर्याय काढावा.

५ ऑगस्ट १९८३ रोजी इंदिरा गांधी लोकसभेत म्हणाल्या की तामिळींच्या प्रश्नांसदर्भात अध्यक्ष जयवर्धने यांच्यासोबत चर्चा केली तेव्हा त्यांनी असे सांगितले की परिस्थिती नियंत्रणात असून ज्या लोकांची हकालपट्टी झाली त्या लोकांना परत देशात बोलावण्यात येईल. अमेरिका आणि इंग्लंकडून आर्थिक आणि धान्याच्या गरजा पुरविल्या जातील. तसेच बेघर झालेल्या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी अध्यक्षांनी विशेष प्राधीकरणाची स्थापना केली होती. भारत श्रीलंकेचे स्वातंत्र्य, एकता यासाठी बांधलेला होता आणि यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू इच्छित नव्हता. दोन्ही देशांच्या ऐतिहासिक सांस्कृतिक वारसा संगोपन करण्यासाठी भारत बांधील होता. विशेष करून तमिळ समाज आणि भारतीय नागरिक यांच्याहातून कुठल्याही प्रकारचे वाईट कृत्य घडणार नव्हते. या संदर्भात लोकांची सुटका व्हावी यासाठी त्यांचे प्रयत्न होते. ते एकट्या सरकारकडून नियंत्रणात येऊ शकत नव्हते. त्यासाठी श्रीलंकन रिलीफ फंडची स्थापना केली. बेकायदेशीरपणे संपत्तीचे नुकसान करून यामध्ये कामी पडलेल्या लोकांच्या सुरक्षेसाठी मदत करणे आवश्यक होते. जयवर्धनेंना असे कळविले होते की या प्रश्नामध्ये कायमचा तोडगा काढून समाधानकारक तमिळ अल्पसंख्यकांना संरक्षणाची हमी द्यावी. ऑक्टोबर १९८३ मध्ये तमिळ आणि सिंहली यांच्यामध्ये हिंसक संघर्ष घडला होता. जयवर्धनेंच्या भारत भेटीदरम्यान इंदिरा गांधींनी समस्या सोडविण्यासाठी चर्चा केली. तमिळ मुक्ती मोर्चा काही सन्मानजनक कराराच्या

हेतूने प्रयत्नरत होते. जयवर्धने आणि इंदिरा गांधी यांच्यात झालेल्या करारानुसार काही उपाय योजना करण्यात आल्या. १. जिल्हा विकास परिषदेचा पूर्णपणे अधिकार लागू करणे, २. तमिळ भाषा ही राष्ट्रीय भाषा म्हणून कायदेशीर करणे. ३. हिंसा घडू नये यासाठी पुढाकार घेण्यात सशस्त्र दलाची प्रत्यक्ष कृतीशील भूमिका संपवणे. ४. जाफनामधील लष्करी तुकड्या मागे घेणे, ५. आतंकवादविरोधी कायदा लागू करणे. एकंदरीत जयवर्धने यांची भारताशी पारस्पारिक मैत्री टिकवून ठेवण्याचे जे प्रयत्न होते ते प्रशंसनीय होते.

**सारांश**

एकंदरीत इंदिरा गांधीच्या १९८० ते १९८४ या कालावधीत भारताच्या शेजारील राष्ट्रांच्या संबंधाचा वरीलप्रमाणे आढावा घेण्यात आला आहे. यावरून असे स्पष्ट होते की, पाकिस्तान, बांग्लादेश, चीन, नेपाळ आणि श्रीलंका इत्यादी शेजारील देशांबद्दल इंदिरा गांधी यांचे संबंध मैत्रिपूर्ण शांततेच्या मार्गाने तोडगा काढण्यावर राहिलेले आहेत. या काळात त्यांनी मैत्रीपूर्ण संबंधावर भर देऊन व्यापारास सहकार्य करणे, कोणत्याही गंभीर प्रश्नांवर चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढण्यावर प्राधान्य दिलेले दिसून येते.

**संदर्भग्रंथ**

१. "पुटिंग दि फॅक्टस स्ट्रेट, ३० जानेवारी १९८०, सिलेक्टेड स्पीचेस अँड राइटिंग्ज ऑफ इंदिरा गांधी, पब्लिकशन डिव्हिजन, भारत सरकार, नवी दिल्ली, १९८५, खंड ४
२. "अॅट अ टर्निंग पॉईंट", १५ ऑगस्ट १९८०, सिलेक्टेड स्पीचेस अँड राइटिंग्ज ऑफ इंदिरा गांधी
३. "गुड नायबरलीनेस्", ८ ऑक्टोबर १९८१, सिलेक्टेड स्पीचेस अँड राइटिंग्ज ऑफ इंदिरा गांधी, २३ ऑगस्ट १९८२
४. "दि क्राईसिस ऑफ एशिया अँड दि वर्ल्ड", १ ऑक्टोबर १९८१, सिलेक्टेड स्पीचेस अँड राइटिंग्ज ऑफ इंनिरा गांधी, नोव्हेंबर १९८३
५. "साऊथ एशियन को-ऑपरेशन", सिलेक्टेड स्पीचेस अँड राइटिंग्ज ऑफ इंदिरा गांधी, पब्लिकेशन डिव्हिजन, भारत सरकार, नवी दिल्ली, १९८६, खंड ५
६. "आऊटकम ऑफ दि कॅनकून कॉन्फरन्स", सिलेक्टेड स्पीचेस अँड राइटिंग्ज ऑफ इंदिरा गांधी, २७ ऑक्टोबर १९८१
७. गोपालकृष्ण शर्मा, १९७१ के बाद भारतीय विदेश नीती की बदलती अवधारणाएँ, जयपूर, १९९१.
८. आय. के. गुजराल, मॅटर्स ऑफ डिस्क्रीशन अॅन ऑटोबायोग्रफी, नवी दिल्ली, २०११
९. "नॅशनल अँड इंटरनॅशनल इस्यूज", सिलेक्टेड स्पीचेस अँड राइटिंग्ज ऑफ इंदिरा, २५ एप्रिल १९८०,
१०. "स्टेडी रिकव्हरी: क्लिअर डायरेक्शन", सिलेक्टेड स्पीचेस अँड राइटिंग्ज ऑफ इंदिरा गांधी, २१ ऑक्टोबर १९८०
११. "ऑन हर परफॉर्मन्स", सिलेक्टेड स्पीचेस अँड राइटिंग्ज ऑफ इंदिरा गांधी, २९ डिसेंबर १९८०